# न्यूज एक्सप्रेस मराठी

मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल



बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!

: ९८३४१३८४८२




# पंतप्रधान मोदींच्या सभेमुळे 'वारे फिरले'

## लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पश्चिम महाराष्ट्रमध्ये जाहीर सभांचा झंझावत

**पिंपरी | प्रतिनिधी**

देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पश्चिम महाराष्ट्रमध्ये जाहीर सभांचा झंझावत सुरू केला. पुण्यातील रेसकोर्स मैदानावर मोदींची एतिहासिक सभा झाली. यामुळे पुणे, शिरूर आणि मावळ यासह बारामती लोकसभा मतदारसंघातील महायुतीच्या उमेदवारांना फायदा होणार आहे. मोदी सरकारचे व्हीजन आणि देशहिताचे निर्णय यामुळे महायुतीचे पारडे जड झाले असून शिरूरमध्ये शिवाजीराव आढळराव पाटील यांच्या प्रचाराला गती मिळाली आहे.

राष्ट्रवादी कॉंग्रेस अजित पवार गटाकडून घड्याळ या चिन्हावर शिवाजीराव आढळराव पाटील निवडणुक लढवत आहे. शिरूर लोकसभा मतदारसंघाचा विचार करता खेडस, आंबेगाव, जुन्नर आणि हडपसर विधानसभा मतदारसंघात राष्ट्रवादी अजित पवार यांच्या विचारांचे आमदार आहेत. त्यामुळे सहापैकी ४ मतदारसंघात राष्ट्रवादी ताकद वैयक्तिकरित्या मोठी आहे. तसेच भोसरीमध्ये भाजपचे आमदार महेश लांडगे यांनी तब्बल १ लाख मतांचे दीड देण्याचा निर्धार झाला. एकमेव शिरूर विधानसभा मतदार शरद पवारांच्या विचारांचे अशोक पवार आमदार आहेत. मात्र, या ठिकाणी महायुतीकडून भाजपचे जिल्हा परिषद अध्यक्ष प्रदीप कंद यांच्या माध्यमातून जोरदार मोर्चेबांधणी करण्यात आली आहे.

दरम्यान,महायुतीच्या प्रत्यक पदाधिकाऱ्यांवर टीम नोचा वॉच आहे. प्रत्येक पदाधिकारी त्यांना दिलेली जबाबदारी सक्षमपणे पार पाडतो किंवा नाही ? याचा लेखाजोखा प्रदेश कार्यालयाकडे पाठवण्यात येणार आहे. त्याद्वारे अपेक्षित काम न केलेल्या उमेदवारांचा इच्छूकांचा रिपोर्ट तयार करण्यात येणार आहे. त्यामुळे महायुतीचे पदाधिकारी आता अंग झाडून कामाला लागले आहे.



### अजित पवार तळ ठोकणार...!

» बारामती लोकसभा मतदार संघाचे मतदान ७ मे रोजी पूर्ण झाल्यानंतर पुढील ३ ते ४ दिवस अजित पवार शिरुर लोकसभा मतदार संघामध्ये तळ ठोकणार आहेत. त्यामुळे मतदार संघातील प्रचारामध्ये 'बोटचेपी' भूमिका घेणाऱ्या पदाधिकाऱ्यांना उत्तरे द्यावी लागणार आहेत. अद्याप काही ठिकाणी राष्ट्रवादीचे स्थानिक नेते 'ॲक्टिव्ह' झालेले नाहीत. त्याबाबत अजित पवार स्वतः जातीने लक्ष घालतील असे सांगण्यात येते. त्यामुळे आढळराव पाटील यांची 'बारी' बसणार, असे वातावरण निर्माण झाले आहे.

### महायुतीची वज्रमूठ...

» मोदी यांनी आपल्या भाषणात बोलताना राष्ट्रवादी शरद पवार पक्षाचे सर्वेसर्वा आणि ज्येष्ठ नेते शरद पवार यांना लक्ष्य केले. "गेल्या ४५ वर्षापासून महाराष्ट्र अतृप्त आत्म्यांची शिकार ठरला आहे," असा घणाघात केला. महाविकास आघाडीची मदार राज्यात शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे आणि शरद पवार यांच्या खांद्यावर आहे. त्यामुळे महायुतीकडून या दोन्ही नेत्यांची कोंडी करण्याची रणनिती आखली आहे. दरम्यान, उरळी कांचन येथे शिरुरचे महाविकास आघाडीचे उमदेवार अमोल कोल्हे यांच्या प्रचारासाठी जाहीर सभा झाली. शरद पवार यांच्या सभेला अपेक्षीत प्रतिसाद न मिळाल्यामुळे महाविकास आघाडीच्या समर्थकांमध्ये अस्वस्थता पहायला मिळत आहे. दुसरीकडे, मोदींच्या सभेमुळे महायुतीला मात्र चैतन्य प्राप्त झाले आहे, असे निरीक्षण राजकीय जाणकारांनी नोंदवले आहे.

# मतदानाच्या दिवशी पालिकेकडून सुट्टी जाहीर

## सार्वजनिक सुट्टी देण्याचे परिपत्रक पालिका आयुक्त शेखर सिंह यांनी काढले

**पिंपरी | प्रतिनिधी**

मावळ आणि शिरुर लोकसभा मतदार संघासाठी एकाच दिवशी मतदान होणार आहे. सर्वांना मतदानाचा हक्क बजावता यावा, यासाठी मतदानाच्या दिवशी पिंपरी-चिंचवड महापालिकेने दोन्ही मतदार संघात राहणा-या अधिकारी व कर्मचा-यांना सार्वजनिक सुट्टी जाहीर केली आहे.

अत्यावश्यक सेवेतील कर्मचा-यांना मतदान करता यावे, यासाठी आवश्यक ते नियोजन करण्याचे आदेश आयुक्त शेखर सिंह यांनी विभागप्रमुखांना दिले आहेत.

पिंपरी-चिंचवड महापालिकेचा काही भाग मावळ आणि शिरूर लोकसभा मतदारसंघात येतो. येत्या १३ मे रोजी या दोन्ही मतदारसंघासाठी मतदान होणार आहे.

मतदानाचा टक्का वाढावा, यासाठी निवडणूक विभागाने जनजागृतीचे अनेक उपक्रम हाती घेतले आहेत. नागरिकांनी मतदान करून आपला हक्क बजावावा, यासाठी पालिकेने जनजागृती केली आहे. तसेच, या दिवशी औद्योगिक भागातील कंपन्यांमधील कामगारांना देखील मतदान करता यावे, याकरिता सुट्टी जाहीर करण्याचा आदेश दिला आहे.

या पार्श्वभूमीवर मावळ किंवा शिरूर लोकसभा मतदार संघात वास्तव्य असलेल्या महापालिका सेवेतील कर्मचा-यांना मतदान करता यावे, यासाठी सार्वजनिक सुट्टी देण्याचे परिपत्रक पालिका आयुक्त शेखर सिंह यांनी काढले आहे.



### आवश्यक ते नियोजन करण्याचे आदेश

» पालिकेचे जे कर्मचारी, अधिकारी हॉस्पिटल, अग्निशामक दल, पाणीपुरवठा, सुरक्षा व्यवस्था या अत्यावश्यक सेवेत येतात, ते कर्मचारी मतदानापासून वंचित राहू नयेत. त्यांना आपला मतदानाचा अधिकार बजाविता यावा, यासाठी आवश्यक ते नियोजन करण्याचे आदेश आयुक्त सिंह यांनी दिले आहेत.

# जनता पंतप्रधान मोदींच्या पाठीशी

## मोदींच्या नेतृत्वालाच जनता पसंती देईल: प्रकाश जावडेकर

**पुणे | प्रतिनिधी**

इंडिया आघाडीमध्ये असलेले पक्ष हे घराणेशाहीचे पक्ष आहेत. त्यामुळे परिवार बचाव हाच त्यांचा एक कलमी कार्यक्रम आहे. देशातील जनतेचे हित प्रथम मानणाऱ्या मोदींच्या नेतृत्वालाच जनता पसंती देईल हे स्पष्ट आहे, असा विश्वास माजी केंद्रीय मंत्री प्रकाश जावडेकर यांनी पुण्यात पत्रकार परिषदेत व्यक्त केला. भाजपचे पुणे लोकसभेचे उमेदवार मुरलीधर मोहोळ यांच्या प्रचारार्थ आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते.



जावडेकर म्हणाले की, प्रधानमंत्री नरेंद्र मोदींच्या नेतृत्वावर जनतेचा विश्वास त्यांनी दहा वर्षात करून दाखवलेले काम, जगामध्ये भारताची वाढलेली प्रतिष्ठा, देशाची झालेली आर्थिक प्रगती, देशात गरीब कल्याण योजना लोकांपर्यंत पोहोचल्यामुळे आहे. २०१४ मध्ये भारताची ख्याती एक जर्जर अर्थव्यवस्था अशी होती.

आता ती पहिल्या ५ मजबूत अर्थव्यवस्थांमध्ये गणली जाते. याबरोबर रस्ते, रेल्वे, बंदर, जलमार्ग, विमान वाहतूक अशा सर्व महत्त्वाच्या क्षेत्रांमध्ये फार मोठे बदल लोकांना अनुभवायला मिळाले. गरिबांना सामर्थ्यवान बनवण्यासाठी ज्या पद्धतीने असंख्य समाजकल्याण योजना मोदी सरकारने यशस्वी व प्रभावीपणे पार पाडल्या, त्या प्रत्येकापर्यंत पोहोचल्या.

या सर्वांचा जनतेच्या मनावर खोल परिणाम झाला आहे. त्यामुळे पुन्हा एकदा देशातील जनता देशहित प्रथम मानणाऱ्या मोदींच्या नेतृत्वालाच पसंती देईल, हे स्पष्ट असल्याचा दावा जावडेकर यांनी केला आहे.

जावडेकर म्हणाले, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दहा वर्षामध्ये केलेल्या कामामुळे देशाची आर्थिक प्रगती झाली आहे. जगामध्ये देशाची प्रतिष्ठा वाढली आहे. देशातील प्रत्येक नागरिकांपर्यंत मोदी सरकारच्या योजना पोहचल्या आहेत. त्यामुळे मोदींवर लोकांचा विश्वास अधिक वाढला असल्यामुळे यावेळी भाजपच्या नेतृत्वातील एनडीएला मोठे बहुमत मिळणार आहे.

देशामध्ये रेल्वे, बंदरे, जलमार्ग आणि विमानतळे अशा पायाभुत सुविधांमध्ये मोदी सरकारने मोठे काम केले आहे. देशात प्रत्येक कुटूंबापर्यंत विकास पोहचला असल्याचे जावडेकर यांनी सांगितले.

देशामध्ये 77 लाख लोकांकडे आज इंटरनेटची सुविधा आहे. जगात सर्वात स्वस्त डेटा हा भारतात मिळतो.नागरिकांच्या थेट खात्यामध्ये विविध योजनांचे पैसे जमा केले जातात. 34 लाख कोटी रुपये मोदी सरकारने गरीबांच्या खात्यात जमा केले त्यामुळे मोदींना मत जनता देणार आहे.

लोकसभेची निवडणूकाचा संग्राम हा देश एकसंघ मानणारे विरुध्द देशाचे उत्तर दक्षिण असा भेद निर्माण करणाऱ्यांमध्ये आहे. राष्ट्र प्रथम विरुध्द परिवार प्रथम मानणाऱ्यांमध्ये हा संघर्ष असल्याचे भाजपचे माजी केंद्रीय मंत्री प्रकाश जावडेकर यांनी पत्रकार परिषदेत सांगितले. यावेळी महायुतीचे समन्वयक संदीप खर्डेकर प्रदेश प्रवक्ते संजय मयेकर, सहप्रसिध्दी हेमंत लेले,पुष्कर तुळजापुरकर यावेळी उपस्थित होते.

### विरोधकांचा खोटा प्रचार

» 35 कोटी युवक आणि महिलांना मुद्रा कर्ज योजनेमुळे 20 कोटीहून अधिक रोजगार निर्माण झाले. यामध्ये देशाची अर्थव्यवस्था अधिक बळकट झाली असल्याचे जावडेकर म्हणाले.विरोधी पक्ष सध्या एनडीएला 272 पर्यंत रोखण्याची भाषा करत आहे. त्यांच्यामध्ये निराशा असून पराभव समोर दिसत असल्यामुळे अशा प्रकारची विधाने केली जातात. विरोधक खोटा प्रचार करत आहेत. विरोधकांच्या प्रचाराला हितसंबंधी गट देशातून आणि विदेशातूनही मदत करीत आहेत. एका टूलकिटनुसार त्यांचा प्रचार सुरु आहे, परंतू त्याचा पराभव झाल्याशिवाय राहणार नाही असे जावडेकर म्हणाले

# वाहतुकीची कोंडी सोडविण्यासाठी, चांदणी चौक प्रकल्प

## भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी दुमजली उड्डाणपुलामुळे वाहतूक सुसह्य झाली

**पुणे | प्रतिनिधी**

शहराच्या बाजूने जाणाऱ्या महामार्गांमुळे शहराच्या प्रवेशद्वारांवर आणि अंतर्गत भागात होणारी वाहतुकीची कोंडी सोडविण्यासाठी चांदणी चौकातील बहुमजली उड्डाणपूल प्रकल्प पथदर्शी ठरेल, त्यामुळे शहराच्या विकासचक्राला गती मिळेल असा विश्वास पुणे लोकसभा मतदारसंघातील भाजप महायुतीचे उमेदवार मुरलीधर मोहोळ यांनी व्यक्त केला.

मोहोळ यांच्या प्रचारार्थ कोथरूड विधानसभेतील भेलकेनगर, गुजरात कॉलनी, आझादनगर, शास्त्री नगर, सुतारदरा, जय भवानीनगर, रामबाग कॉलनी, हनुमाननगर मार्गे मेगा सिटी परिसरात प्रचार फेरीचा समारोप झाला.



राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, माजी खासदार संजय काकडे, राष्ट्रवादी काँग्रेसचे शहराध्यक्ष दीपक मानकर, मनसेचे नेते किशोर शिंदे, सुधीर धावडे, डॉ. संदीप बुटाला, माजी नगरसेविका छाया मारणे, वासंती जाधव, अल्पना वरपे, डॉ. श्रद्धा पाठक, दिलीप वेडे पाटील, किरण दगडे पाटील यांचा प्रमुख सहभाग होता.

मोहोळ म्हणाले, "शहर आणि परिसरातील वाहतुकीची कोंडी कमी करण्यासाठी राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने (एनएचएआय) कायमस्वरूपी तोडगा काढावा अशी आग्रही मागणी मी महापौर असताना केली होती. केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांच्या मार्गदर्शनाखाली हा महत्त्वाकांक्षी प्रकल्प पूर्ण झाला."

मोहोळ पुढे म्हणाले, "त्याच धर्तीवर गतिमान, सुरळीत आणि सुरक्षित वाहतुकीसाठी शहराच्या विविध भागात 21 ठिकाणी उड्डाणपूल, रेल्वे उड्डाणपूल किंवा ग्रेड सेपरेटर उभारण्यात येणार आहेत. शहराच्या वाहतूक कोंडीवर मार्ग काढण्यासाठी आणि अन्य प्रकल्पांसाठी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जाहीर केलेल्या दोन हजार कोटी रुपयांच्या तरतुदीतून ही कामे केली जाणार आहेत."

### पुण्यातील पहिला दुमजली उड्डाणपूल

» "नळस्टॉप चौकात मेट्रो आणि महापालिकेचा संयुक्त प्रकल्पातून उभारलेल्या भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी दुमजली उड्डाणपुलामुळे कर्वे रस्ता परिसरातील वाहतूक सुसह्य झाली आहे. पुण्यातील हा पहिलाच दुमजली उड्डाणपूल असून, पुलावरून चार पदरी वाहतूक सुरू झाली आहे. त्यामुळे वाहतुकीचा आणि प्रवासाचा वेळ वाचण्यास मदत झाली आहे."

# लाच घेताना सहायक अभियंता जाळ्यात

## भोसरी शाखेतील सहायक अभियंत्याला लाच-लुचपत प्रतिबंधक विभागाने रंगेहात पकडले

**पिंपरी | प्रतिनिधी**

विद्युत भार वाढवून देण्यासाठी ४५ हजार रुपयांची लाच घेताना महावितरण भोसरी शाखेतील सहायक अभियंत्याला लाच-लुचपत प्रतिबंधक विभागाने रंगेहात पकडले. या प्रकरणी एका इलेक्ट्रॉनिक्स कंपनीच्या कर्मचाऱ्याने तक्रार केली असून भोसरी पोलीस ठाण्यात लाचखोर सहायक अभियंता किरण गजेंद्र मोरे (वय ३३) याच्या विरोधात तक्रार दाखल करुन त्याला अटक करण्यात आली आहे.




लाच-लुचपत प्रतिबंधक विभागाकडून मिळालेल्या माहितीनुसार तक्रारदार व्यक्ती एका इलेक्रॉनिक्स कंपनीत कामाला आहे. तक्रारदार व्यक्तीच्या कंपनीला दुसऱ्या एका कंपनीचे विद्युत भार वाढविण्याचे काम मिळाले होते. त्यानुसार तक्रारदाराने महावितरण कार्यालयात रितसर अर्ज केला. परंतु हे काम करण्यासाठी महावितरणचे सहायक अभियंता किरण मोरे याने ५० हजार रुपयांची लाच मागितली.

तक्रारदाराने याबाबत लाच-लुचपत प्रतिबंधक विभागाला माहिती दिल्यानंतर विभागाने सापळा रचला. पंचांसमक्ष किरण मोरे हा ४५ हजार रुपयांची लाच घेऊन काम करण्यास तयार झाला आणि पंचांसमक्ष त्याने लाच देखील स्वीकारली. त्यावेळी लाच-लुचपत प्रतिबंधक विभागाने त्याला अटक केली. याबाबत भोसरी पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्याचे काम सुरु आहे. किरण गजेंद्र मोरे (वय 33) असे अटक केलेल्या सहायक अभियंत्याचे (वर्ग-2) नाव आहे. याप्रकरणी 47 वर्षीय व्यक्तीने एसीबीकडे तक्रार केली आहे.

एसीबीने दिलेल्या माहितीनुसार, तक्रारदार हे फ्रेंड इलेक्ट्रोनिक्स कंपनीचे सर्व कामकाज पाहतात. कंपनीला सन राईस कंपनीचे विद्युत भार वाढविण्याचे काम मिळाले होते. विद्युत भार वाढविण्यासाठी तक्रारदार यांनी महावितरणच्या कार्यालयात अर्ज केला होता. त्या अर्जावर पुढील कार्यवाही करण्यासाठी अर्ज किरण मोरे यांच्याकडे(आला होता.

ही कारवाई विभागाचे पोलीस उपायुक्त/ अधीक्षक अमोल तांबे, अपर पोलीस अधीक्षक डॉ. शीतल जानवे यांच्या मार्गदर्शनाखाली उपअक्षीक्षक नितीन जाधव व त्यांच्या पथकाने केली. सरकारी कर्मचाऱ्याने लाच मागितल्यास टोल फ्री क्रमांक १०६४, अँटी करप्शन ब्युरो पुणे २६१२२१३४, २६१३२८०२, व्हॉट्स ॲप क्रमांक ७८७५३३३३३३ या क्रमांकावर संपर्क करण्याचे आवाहन विभागाच्या वतीने करण्यात आले आहे.

> “ महावितरण प्रशासन किंवा महापालिका प्रशासन असो लाचखोरीचे प्रमाण वाढले आहे.अनेकदा सर्वसामान्य नागरिक अँटी करप्शन कडे तक्रार करत नाहीत. महापालिका प्रशासनामध्ये तर राजकीय राजवट सुरू असल्यामुळे अधिकाऱ्यांचे फावले आहे. आर्थिक लाभ घेतल्याशिवाय काम पूर्ण होत नाही. त्यामुळे सर्वसामान्य नागरिकांची अक्षरशा लूट होत आहे.
>
> - तुषार कामठे , शहराध्यक्ष ,राष्ट्रवादी शरद पवार पक्ष.

# पवना धरणात केवळ 34 टक्के पाणीसाठा शिल्लक

## पावसाळा लांबल्यास पिंपरी-चिंचवड शहरावर पाणी संकट उभे राहण्याची दाट शक्यता

**पिंपरी | प्रतिनिधी**

उन्हाच्या झळा तीव्र होत असल्याने पिंपरी चिंचवड शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या पवना धरणातील पाणीसाठा दिवसेंदिवस झपाट्याने कमी होत आहे. धरणात सोमवार (दि.२९) पर्यंत ३४ टक्के पाणीसाठा होता. तीव्र उन्हामुळे पाण्याचे बाष्पीभवन होत असून, वाढत्या उन्हामुळे पाण्याची मागणी वाढल्याने साठा घटत आहे. पावसाळा लांबल्यास पिंपरी-चिंचवड शहरावर पाणी संकट उभे राहण्याची दाट शक्यता आहे.



पवना धरणातून पिंपरी-चिंचवड शहरासह महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ (एमआयडीसी), मावळ तालुक्यातील काही ग्रामपंचायत व नगर परिषदेला पाणी दिले जाते. एकट्या पिंपरी-चिंचवड महापालिकेस सर्वाधिक ५१३ एमएलडी पाणी दिले जाते. हे पाणी पवना नदीत सोडले जाते. शहरासाठी पवना नदी पात्रातील रावेत बंधारा येथून पाणी उचलण्यात येते.

गेल्या साडेचार वर्षापासून शहराला दिवसाआड पाणीपुरवठा केला जात आहे.अनेक भागांत पुरेशा प्रमाणात पाणी मिळत नसल्याच्या तक्रारी आहेत. पुरेसे पाणी मिळत नसल्याने अनेक मोठ्या हाऊसिंग सोसायट्यांना खासगी टँकरने पाणी मागवावे लागते. त्यांचा आर्थिक भुर्दंड सोसायट्यांना सहन करावा लागत आहे. असे चित्र असताना, पवना धरणातील पाण्याचा साठा झपाट्याने कमी होत आहे. तीव्र उन्हामुळे धरणातील पाण्याचे बाष्पीभवन होत आहे. उन्हाचा पारा वाढल्याने पाण्याच्या मागणीत मोठी वाढ झाली आहे. त्यामुळे धरणातील पाणी साठा दिवसेंदिवस घटत आहे. सध्या धरणात ३४ टक्के उपयुक्त पाणीसाठा आहे. ते पाणी १५ जुलैपर्यंत पुरेल, असे पाटबंधारे विभागाच्या अधिकार्यांनी सांगितले. मात्र, पावसाळा लांबणीवर पडल्यास पिंपरी- चिंचवड शहराला पाणी टंचाईचा सामना करावा लागणार आहे. त्यामुळे उपलब्ध पाण्याचा काटकरिने वापर करण्याचे आवाहन नागरिकांना करण्यात आले आहे.

### पिण्याचे पाणी काटकसरीने वापरण्याचे आवाहन..

» पिण्याच्या पाण्याचा घरगुती वापरासाठी काटकसरीने वापर करावा. पाणी हे शिळे होत नसल्याने शिल्लक असलेले पाणी फेकून देऊ नये. पिण्याचे पाणी हे वाहने स्वच्छ करणे. बागकाम व कुंड्यासाठी, घर किंवा इमारत व परिसर स्वच्छ करण्यासाठी, धुण्यासाठी वापरू नये. पाऊस लांबल्यास पाणी कमी पडू नये म्हणून नागरिकांनी पिण्याच्या पाण्याची बचत करावी, असे आवाहन महापालिकेच्या पाणीपुरवठा विभागाचे मुख्य अभियंता श्रीकांत सवणे यांनी केले आहे.

# मशाल विरोधकांना भस्म करेल

## ‘दहा वर्षे सामान्यांच्या प्रश्नांकडे खासदारांची डोळेझाक’; संजोग वाघेरे

**पुणे | प्रतिनिधी**

कुठलेही युद्ध जिंकायचे असेल, तर आपल्या हातात कुठले शस्त्र आहे. त्याची ताकद ओळखून त्या युद्धात उतरावे लागते. आमचे पक्षप्रमुख उद्धवसाहेब ठाकरे यांनी आमच्या हातात “मशाल” हे शस्त्र दिले आहे. स्वाभीमान, निष्ठा आणि क्रांतीचे प्रतिक असलेली हीच “मशाल” विरोधकांना भस्म केल्याशिवाय राहणार नाही, अशा शब्दांत शिवसेना (उध्दव बाळासाहेब ठाकरे) रायगड जिल्हा संपर्कप्रमुख बबनदादा पाटील यांनी विरोधकांवर तोफ डागली.



मावळ लोकसभा मतदारसंघाचे शिवसेना (उध्दव बाळासाहेब ठाकरे) व महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार संजोग वाघेरे पाटील पनवेल विधानसभेत गावभेट दौरा करत बैठका घेत आहेत. गावा गावात मोठ्या जल्लोषात त्यांचे स्वागत केले जात आहे. या दरम्यान झालेल्या बैठकीत ते बोलत होते. या दौ-यात त्यांच्यासोबत शेतकरी कामगार पक्षाचे माजी आमदार बाळाराम पाटील, शिवसेना (उध्दव बाळासाहेब ठाकरे) जिल्हाप्रमुख शिरीष घरत, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे विशेष प्रतिनिधी आर. सी. घरत, पनवेल तालुका चिटणीस राजेश केणी, युवक काँग्रेस जिल्हाध्यक्ष हेमराज म्हात्रे, माजी जिल्हा परिषद सदस्य विलास फडके, शिवसेना उपजिल्हाप्रमुख रामदास पाटील, पनवेल तालुका संपर्कप्रमुख योगेश तांडेल, तालुका अध्यक्ष विश्वास पेटकर यांच्यासह महाविकास आघाडीतील मित्र पक्षांचे पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पनवेल विधानसभा मतदारसंघातील चीपळे गावापासून प्रचार बैठकांना प्रारंभ करण्यात आला. भोकरपाडा, बोनशेत, विहिघर, नेरे, वाजे, शिवणसई, दुंदरे, चींचवली, रीटघर, धामणी, धोदानी, आंबिवली, वांगणी, पाली, मोहो, शिवकर, उसर्ली, विचुंबे, देवद येथे उमेदवार संजोग वाघेरे पाटील यांचे महिलांनी औक्षण करीत मोठ्या उत्साहात स्वागत केले.

यावेळी संजोग वाघेरेंना मिळणारा प्रतिसाद प्रस्थापितांच्या ऊरात धडक्या भरवणारा असल्याचे सांगताना शेतकरी कामगार पक्षाचे माजी आमदार बाळाराम पाटील म्हणाले की, शेतकरी कामगार पक्ष, शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्ष, काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) गट, तसेच मित्र पक्ष समन्वय साधत प्रचार यंत्रणा. राबवत आहे. संजोग वाघेरे पाटील यांना आघाडी मिळवून देण्यासाठी आम्ही सारे रात्रंदिवस काम करत आहोत. आमची निशाणी मशाल मनामनात रुजवण्यासाठी आम्ही समाजातील शेवटच्या घटकापर्यंत पोहोचत आहोत.

### सामान्यांच्या प्रश्नांकडे खासदारांची डोळेझाक

» या निमित्ताने उमेदवार संजोग वाघेरे पाटील म्हणाले की, नैना प्रकल्प, बहुउद्देशीय कॉरिडोर, मुंबई ऊर्जा मार्ग या प्रकल्पांच्या जमीन भूसंपादनाच्या विषयांमध्ये येथील स्थानिक भूमिपुत्र आणि शेतकरी असमाधान व्यक्त करीत आहेत. सर्वसामान्यांच्या प्रश्नाकडे गेल्या दहा वर्षात खासदारांनी डोळेझाक केली. याला न्याय अधिकार प्राप्त करून देण्यासाठी आपण कटिबद्ध आहोत. शेतकरी व भूमिपुत्रांना न्याय देण्याची भूमिका घेवून आणि या भागातील प्रश्न तडीस नेण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करु, असे ते म्हणाले.

# श्रीरंग बारणे यांचा मावळात प्रचाराचा ‘धुमधडाका’

## खासदार श्रीरंग बारणे यांनी मावळ तालुक्यातील प्रचाराचा शुभारंभ

**पुणे | प्रतिनिधी**

जगद्गुरु संत तुकाराम महाराजांच्या चरणी नतमस्तक होऊन मावळ लोकसभा मतदारसंघातील शिवसेना- भाजप- राष्ट्रवादी- मनसे- आरपीआय- रासप व मित्रपक्ष महायुतीचे उमेदवार खासदार श्रीरंग बारणे यांनी काल (मंगळवारी) मावळ तालुक्यातील प्रचाराचा शुभारंभ केला.




खासदार बारणे यांनी काल मावळ तालुक्याच्या पूर्व भागात प्रचार दौरा केला. चिंचोली, किन्हई, झेंडेमळा, माळवाडी, देहूगाव, सुदुंबरे, सुदवडी, इंदोरी, नवलाख उंबरे, आंबी, वराळे, उर्से, परंदवडी, सोमाटणे, शिरगाव, गहुंजे, शेलारवाडी, मामुर्डी या गावांमध्ये प्रचार फेरी काढून मतदारांशी संपर्क साधला. प्रचार फेरीची सांगता देहूरोड येथे झाली. मोठ्या प्रमाणात पुष्पवृष्टी करून, फटाक्यांच्या आतषबाजीत बारणे यांचे ठिकठिकाणी स्वागत करण्यात आले. सुवासिनींनी औक्षण करून बारणे यांना विजयासाठी शुभेच्छा दिल्या. भर उन्हात विजय रथावर उभे राहून मतदारांना अभिवादन केले. रणरणत्या उन्हात बारणे यांच्या स्वागतासाठी रस्त्याच्या दुतर्फा गर्दी केली होती.

खासदार बारणे यांच्या समवेत मावळचे आमदार सुनील शेळके, भाजपचे नेते व माजी मंत्री बाळा भेगडे, भाजप किसान मोर्चाचे प्रदेशाध्यक्ष गणेश भेगडे, राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष गणेश खांडगे, भाजपाचे निवडणूक प्रमुख रवींद्र भेगडे, तालुकाध्यक्ष भाऊ गुंड, शिवसेनेचे उपजिल्हाप्रमुख शरद हुलावळे, तालुकाप्रमुख राजू खांडभोर, जिल्हा संघटक अंकुश देशमुख, पुणे जिल्हा दूध उत्पादक संघाचे माजी अध्यक्ष बाळासाहेब नेवाळे, मावळ पंचायत समितीचे माजी सभापती विठ्ठल शिंदे तसेच प्रशांत ढोरे, लहुमामा शेलार, रघुवीर शेलार, प्रवीण झेंडे, अरुणाताई पिंजण, संजय पिंजण, ज्योतीताई पिंजण, बाळासाहेब जाधव, सतीश जाधव, सरला गायकवाड, ज्योती वैरागर, बंडोपंत बालघरे, विनायक जाधव, नवनाथ हारपुडे, कृष्णा दाभोळे, तुकाराम जाधव, सविता पिंजण, गुरुमित सिंग रत्तू, मदन सोनिगरा, विशाल खंडेलवाल, सारिका नाईकनवरे, प्रशासक ॲड. कैलास पानसरे आदी मान्यवर होते.

श्रीक्षेत्र सुदुंबरे येथे जाऊन संताजी महाराज जगनाडे यांच्या समाधीचे बारणे यांनी दर्शन घेतले. गावचे माजी सरपंच माणिक गाडे व विद्यमान उपसरपंच बापू बोरकर यांनी ग्रामस्थांच्या वतीने त्यांचे स्वागत केले.

इंदोरी येथील ग्रामदेवता कडजाई मातेच्या यात्रेनिमित्त मंदिरात जाऊन बारणे यांनी आशीर्वाद घेतले. त्यापूर्वी बैलगाडा शर्यतीच्या घाटावर जाऊन शेतकऱ्यांशी संवाद साधला

### तुकोबारायांच्या चरणी नतमस्तक

» देहू येथील स्वागत कमानी जवळ खासदार बारणे यांना क्रेनद्वारे मोठा हार घालण्यात आला. त्यावेळी मोठ्या प्रमाणात फुलांच्या पाकळ्यांचा वर्षावही करण्यात आला. देहू शहराच्या वतीने नगराध्यक्ष पूजाताई दिवटे, नगरसेवक तसेच महायुतीतील सर्व घटक पक्षांच्या पदाधिकाऱ्यांनी बारणे यांचे स्वागत केले. संत तुकाराम महाराज देवस्थानमध्ये जाऊन बारणे तुकोबारायांच्या चरणी नतमस्तक झाले. देवस्थानच्या वतीने अध्यक्ष पुरुषोत्तम महाराज मोरे (इनामदार), विश्वस्त संजय महाराज मोरे, पालखी सोहळा प्रमुख विशाल महाराज मोरे आदींनी खासदार बारणे यांचा सत्कार करून त्यांना निवडणुकीसाठी शुभेच्छा दिल्या.